
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ५५५५
८८००
२५/३/५८
REFBK-0006688



# सुभाषवाद

ग. त्र्यं. माडखोलकर

# सुभाषवाद

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६६८८
क्र. क्र. ६५३८

ग. त्र्यं. माडखोलकर

REFBK-0006688

महाराष्ट्र ग्रंथ भांडार, मुंबई ४

प्र का श क
शं क र
वा म न
कु ल क र्णी
म हा रा ष्ट्र
ग्रं थ भां डा र
मुं ब ई ४

[ या पुस्तकाच्या पुनर्मुद्रणाचे, अनुवादाचे, उतारे घेण्याचे वगैरे सर्व हक्क सौ. **शांता माडखोलकर,** गृहीतागमा, शांतानिवास, शुक्रवार तलावा समोर, नागपूर शहर, यांच्याकडे आहेत. ]

आ वृ त्ति प हि ली
जा ने वा री १९४६

मु द्र क
र. दि. देसाई
न्यू भा र त
प्रिं टीं ग प्रे स
मुं ब ई ४

किं म त
स व्वा
रु प या

माझे मित्र

**वीर हरकरे यांस**

प्रेमादरपूर्वक समर्पण

# निवेदन

दैनिक 'तरुण भारतां' त ता. १८ नोव्हेंबर १९४५ पासून ता. २५ नोव्हेंबर १९४५ पर्यंत सोमवार रजेचा दिवस सोडून, लिहिलेल्या सात अग्रलेखांचें हें पुनर्मुद्रण आहे. श्री. सुभाषचंद्र बोस यांचें आझाद हिंद सरकार आणि आझाद हिंद फौज यांच्यावरून सुचलेले विचार या लेखांत ग्रथित केलेले आहेत. हे लेख 'तरुण भारतां' तून प्रसिद्ध होत असतांनाच ते स्वतंत्र पुस्तक रूपाने प्रकाशित करण्यांत यावे, अशी इच्छा अनेक वाचकांनीं व्यक्त केली होती. माझे मित्र, महाराष्ट्र ग्रंथ भांडाराचे चालक, श्री. शंकरराव कुलकर्णी यांच्या तत्परतेमुळें तो योग आला, हें आभारपूर्वक नमूद करणें अवश्य आहे.

आपल्या धडाडीने, कर्तबगारीने आणि निःस्पृह बाण्याने महाविदर्भांत सर्वश्रुत असलेले नरकेसरी स्मारकमंडळांतील माझे सहकारी वीर (ना. श्री.) हरकरे यांना हें छोटें पुस्तक मी प्रेमादरपूर्वक अर्पण करीत आहे.

या पुस्तकाचीं स्थूल मुद्रितें तपासण्याच्या कामीं चि. चंद्रशेखर याची मदत मुख्यतः झाली. त्या व्रात्य पण बुद्धिमान् मुलाच्या साहसी, संस्कारक्षम मनावर त्यांतील विचारांचा योग्य परिणाम होईल, अशी मला आशा आहे. माझे तरुण मित्र श्री. ज. श्री. देशपांडे आणि श्री. के. ए. पोतदार यांचें जें साह्य झालें, त्याचाहि साभार उल्लेख करणें अवश्य आहे.

शांता-निवास, नागपूर शहर.<br>ता. २ डिसेंबर १९४५

ग. त्र्यं. माडखोलकर.

# माडखोलकरांची पुस्तकें

## कादंबरी

१ मुक्तात्मा
२ भंगलेलें देऊळ
३ शाप
४ कांता
५ दुहेरी जीवन
६ मुखवटे
७ नवे संसार ( जप्त )
८ डाकबंगला
९ नागकन्या
१० चंदनवाडी
११ प्रमद्वरा [ जप्त )
१२ युद्धाचे बळी

# माडखोलकरांचीं पुस्तकें

## प्रबंध

१ आधुनिक कविपंचक
२ विष्णु कृष्ण चिपळूणकर
३ विलापिका
४ वाङ्मयविलास
५ स्वैर-विचार
६ माझे आवडते लेखक
७ अवशेष
८ आव्हान
९ माझी नभोवाणी
१० परामर्श
११ जीवन-साहित्य
१२ व्यक्तिरेखा
१३ सुभाष वाद
१४ दोन तपें

## कथासंग्रह

१ शुक्राचें चांदणें
२ रातराणीचीं फुलें

नि.
सं.नं. १८५
दा. क. ६६८८
६५३८

दिल्लीच्या इतिहासप्रसिद्ध लाल किल्ल्यांत आझाद हिंद फौजेवर सध्यां चालू असलेल्या खटल्याचा निकाल लष्करी कोर्ट कांहींहि देवो. पण श्री. सुभाषचंद्र बोस आणि त्यांची स्वातंत्र्यसेना यांचा जो जयजयकार गेले तीन महिने देशांत सतत एकमुखानें चालू आहे, त्यावरून या खटल्याच्या मुळाशीं असलेल्या क्रांतिकारक तत्त्वाला जनतेचा पूर्ण पाठिंबा मिळाला आहे, हें मात्र निश्चित. किंबहुना, डॉ. सर तेजबहादुर सप्रू, बक्षी सर टेकचंद आणि कुंवर सर दिलीपसिंग यांच्यासारखे कायद्याच्या काटेकोर मर्यादांचें चुकूनहि कधीं उल्लंघन न करणारे घटनापंडित आझाद हिंद फौजेचा बचाव करण्यासाठीं कोर्टांत वकीलपत्र घेऊन उभे राहिले, याचा अर्थच हा कीं, त्यांच्या दृष्टीनें श्री. सुभाषचंद्र बोस आणि त्यांची स्वातंत्र्यसेना यांची भूमिका आणि त्यांच्यावर हिंदुस्थान सरकारनें भरलेल्या खटल्याच्या मुळाशीं असलेलें तत्त्व, केवळ राजकीयच नव्हे तर

आंतरराष्ट्रीय राज्यनीतीच्या आणि कायद्याच्या दृष्टीनेंहि, पाया-शुद्ध आहे. हें तत्त्व कोणतें ? हें तत्त्व, परतंत्र जनतेला आपल्या मायदेशाच्या स्वातंत्र्यासाठीं लढण्याचा जन्मसिद्ध हक्क आहे, हें ! वस्तुतः, स्वातंत्र्य हा जर मनुष्याचा जन्मसिद्ध हक्क आहे, तर त्या स्वातंत्र्यासाठीं जरूर तर लढण्याचा हक्कहि माणसाला जन्मजातच असावा, हें स्वाभाविक नाहीं काय ? पण, साम्राज्य-शाही राष्ट्रांनीं जगांतील दुबळ्या दलित देशांचें स्वातंत्र्य तर हिरावून छिनावून घेतलेंच; पण त्यासाठीं लढण्याचा त्यांचा हक्कहि नाकारला, बेकायदेशीर ठरवून टाकला ! मनुष्याच्या आणि राष्ट्रांच्या त्या जन्मजात, मूलभूत हक्काची न्याय्यान्याय्यता आझाद हिंद फौजेवरील खटल्यांत इरेला पडलेली असल्यामुळेंच तो खटला, केवळ हिंदी राजकारणांतच नव्हे तर आंतरराष्ट्रीय राजकारणांतहि, क्रांतिकारक ठरणार आहे.

आणि हा स्वातंत्र्यासाठीं लढण्याचा दलित जनतेचा हक्क हेंच सुभाषवादाचें प्राणभूत तत्त्व होय. १९४२ च्या ऑगस्ट-मध्यें जी उठावणी हिंदुस्थानांत सर्वदूर झाली, त्या उठावणीं-तून ऑगस्टवाद आविर्भूत झाला. ऑगस्टवाद म्हणजे परकीय सत्ता उलथून पाडण्यासाठीं गनिमी काव्यानें उत्पाती चळवळी करण्याचा जनतेचा हक्क. गेल्या महायुद्धांत फ्रान्समधील माकीनी, पोलंड आणि युगोस्लाव्हिया, यांतील देशभक्तांनीं या भूमिगत उत्पाती चळवळीच्या जोरावरच

जर्मनीला जेरीला आणला. पण उत्पाती भूमिगत चळवळींत, नाहीं म्हटलें तरी, एक प्रकारचा नैतिक न्यूनगंड आहे. त्यांतून ऑगस्ट उठावणीच्या गळ्यांत तर अहिंसेच्या शपथेचें लोढणें अडकवलेलें होतें! पण ऑगस्टवादांतील हा नैतिक न्यूनगंड सुभाषवादांत नाहीं. कारण सुभाषवादाचा दावा, त्याची नैतिक आणि राजकीय भूमिका ही आहे कीं, परतंत्र राष्ट्रांना स्वतःच्या स्वातंत्र्यासाठीं समोरासमोर उभें राहून—लपूनछपून, भूमिगत होऊन नव्हे—आमनेसामने लढण्याचा हक्क आहे. हिंदुस्थानाच्या आग्नेयेकडील इंडोचीन आणि इंडोनेशिया या दोन छोट्या राष्ट्रांनीं फ्रेंच आणि डच साम्राज्यशाहीविरुद्ध जें निकराचें झुंज आज चालविलें आहे, तें याच हक्काच्या जोरावर. त्या दृष्टीनें ऑगस्टवादापेक्षां सुभाषवाद हा राजकीय आणि नैतिक दृष्ट्या श्रेष्ठ होय. त्यांत कोणत्याच प्रकारचा न्यूनगंड नाहीं; उलट आत्मप्रत्ययाचा दर्प आणि स्वातंत्र्यप्रेमाची दीप्ति यांनीं तो सुभाषवाद पुंजाळलेला, तेजाळलेला आहे!

सुभाषवादाचें हें अनन्य वैशिष्ट्य, ही नैतिक श्रेष्ठता जपानी वार्ताहर श्री. हागिवारा यांना दिलेल्या मुलाखतींत स्वतः सुभाषचंद्रांनींच विशद केलेली होती. १९४३ सालीं मॅनिला येथें भरलेल्या पत्रकारांच्या परिषदेंत बोलतांना सुभाषबाबूंनीं असें सांगितलें होतें कीं, "माझे आणि गांधींजींचे मार्ग भिन्न असले, तरी ते एकाच ध्येयाप्रत जाणारे आहेत. लष्करी

उठावणीमुळें बहुजनसमाजाचें रक्त आणि भावना उसळून जातील. हिंदी स्वातंत्र्यलढ्याच्या अंतिम यशासाठीं ही लष्करी उठावणी अवश्य आहे. मग त्या उठावणींत माझा स्वतःचा बळी पडला, मला अपेशी मरण आलें, तरी बेहत्तर !!"

( Subhas Chandra Bose characterised his and Gandhi's political ideas as different roads toward the same single goal. Bose, unlike Gandhi, made it clear that he believed that military action would stir the blood and passion of his colleagues as well as the mass of the people. He believed that such action was necessary for the ultimate success of the Indian emancipation movement, even if he himself should die miserably in failure. ) या घोषणेंत सुभाषवादाचें प्रारंभिक अपेश जसें गृहीत धरलेलें आहे, तशीच त्याची अंतिम अपरिहार्यता आणि यशस्विताहि गृहीत धरलेली आहे. आणि, डॉ. सुकर्ण यांनीं इंडोनेशियांत स्थापन केलेल्या लोकसत्ताक राज्याच्या लढ्याचें नजरेच्या टप्प्यांत आलेलें यश लक्षांत घेतां, सुभाषचंद्रांचें हें भावी लढ्याचें स्वप्न भ्रामक आहे, असें कोण म्हणेल? किंबहुना, ते क्रांतदर्शी होते म्हणूनच त्यानीं आझाद हिंद सेना उभारली, आझाद हिंद राज्य स्थापन केलें आणि राजकीय

क्रांतीचा अंतिम मार्ग जनतेला दाखवून दिला! नवल नाहीं कीं, डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांनीं सांगितल्याप्रमाणें, अमरावतीच्या नवप्रसव मातांनीं आपल्या तान्हुल्यांना ‘ सुभाषचंद्र ’ हें नांव ठेवून स्वातंत्र्ययुद्धाचा केशरी टिळा पाळण्यांत घालतांनाच त्यांच्या कपाळीं लावावा!!

१८ नोव्हेंबर १९४५

# २

(१) सुभाषवाद आणि गांधीवाद यांत विरोध आहे काय ?

(२) ऑगस्टवाद हें जर खरोखरीच गांधीवादाचें अपत्य असेल, तर सुभाषवाद आणि गांधीवाद यांत विरोध असण्याचें कारण काय ?

(३) दक्षिण महाराष्ट्रांत सध्यां गाजत असलेलें 'पत्री सरकार' हें जर गांधीवादाला आक्षेपार्ह वाटत नसेल, तर श्री. सुभाषचंद्र बोस यांचें आझाद हिंद सरकार आणि आझाद हिंद सैन्य हीं गांधीवादाच्या आशीर्वादाला योग्य कां ठरूं नयेत ?

सुभाषवादासंबंधीं जी उत्साहाची ऊर्मि सध्यां सर्व देश-भर उसळली आहे, तिच्यांतून उद्भवणारे हे तीन प्रश्न अत्यंत समयोचित, अत्यंत समर्पक आहेत. खुद्द म. गांधी यांनीं स्वतः आझाद हिंद सरकार आणि आझाद हिंद फौज यांच्या-संबंधीं एक अवाक्षरहि अद्याप काढलेलें नाहीं; व १९४२ च्या ऑगस्टमधील उत्पाती उठावणीलाहि त्यांनीं मान्यता अशी

केव्हांच दिलेली नाहीं. फक्त ती उठावणी ही सरकारनें निव्वळ कुरापतखोरीनें अकारण अनपेक्षित रीत्या सुरू केलेल्या निरर्थक दडपशाहीची स्वयंस्फूर्त प्रतिक्रिया होती, असें त्यांनीं तिचें प्रथमपासून समर्थन केलें आहे, एवढेंच. किंबहुना, त्यांचे पट्टशिष्य श्री. राजगोपालाचार्य यांच्या कांग्रेसमध्यें पुन्हा प्रवेश करण्याच्या प्रयत्नाला, त्यांनीं ऑगस्ट आंदोलनाचा विश्वासघात ( betrayal ) केला असा आक्षेप घेऊन, जेव्हां तामिल आणि आंध्र प्रांतांतील कांग्रेस कमिट्यांनीं विरोध केला, तेव्हां तामिलनद हरिजन सेवासंघाचे कार्यवाह श्री. गोपालस्वामी यांना ता. ३० ऑक्टोबर रोजीं पाठविलेल्या पत्रांत राजाजींची तरफदारी करतांना महात्माजींनीं असे उद्गार काढले होते कीं, "....लोकांनीं जी दंगल माजविली, तिच्याशीं कांग्रेसचा किंवा माझा कांहींहि संबंध नाहीं. सरकारनें केलेल्या उतावळ्या सर्रास धरपकडीविरुद्ध लोकांनीं त्वेषानें उठावणी केली, यांत शंका नाहीं. पण कायदेभंगाची चळवळ फक्त मीच सुरू करूं शकतों. मी ती मुळींच सुरू केलेली नव्हती. कांहीं बाबतींत लोकांचा संयम सुटला. पण सरकारच्या बेफाम अत्याचारांनीं लोकांच्या साऱ्या अत्याचारांवर मात केली!" ( In so far as people caused any disturbances neither the Congress nor I have anything to

do with them. There is no doubt that the people resented and rose against hasty and wholesale arrests. Civil disobedience movement could be only started by me. I never started it. In some cases people lost self-control. But the Government's senseless violence eclipsed all popular violence) गांधीजींच्या या उद्गारांवरून हें स्पष्ट आहे कीं, ते ऑगस्ट उठावणी ही सरकारच्या अत्याचारांची केवळ प्रतिक्रिया म्हणूनच फक्त समर्थनीय मानतात.

अर्थात् ऑगस्टवाद हें सत्य आणि अहिंसा हीं दोन महान् तत्त्वें प्राणभूत मानणाऱ्या गांधीवादाचें अपत्य नव्हे. तें गांधीवादाचें औरस अपत्य तर नव्हेच, पण अनौरस अपत्य म्हणणेंहि अयोग्य होईल. ऑगस्टवादाला जे गांधीवादाचें अपत्य समजतात किंवा ऑगस्ट उठावणी ही गांधीजींना मान्य असल्याचा आभास जे उत्पन्न करतात, ते गांधीजी आणि गांधीवाद या दोहोंनाहि जाणून वा नेणून अन्याय करतात. असें म्हटलें पाहिजे. कारण गांधीवादाचीं प्राणभूत तत्त्वें हीं सनातन व म्हणून अचल आहेत. कोणत्याहि एका समाजाच्या वा राष्ट्राच्या सोइसाठीं त्यांत बदल होण्याची, त्यांना मुरड घातली जाण्याची शक्यता नाहीं. सत्य आणि अहिंसा यांच्यावर अधिष्ठित झालेला गांधीवाद हा कोणत्याहि एका

विशिष्ट समाजाच्या किंवा राष्ट्राच्या उद्धारार्थ नाहीं; त्याचें कार्यक्षेत्र अखिल मानवजाति, सर्व जग हें आहे. आज जगाचा सारा व्यवहार असत्य आणि हिंसा यांनीं सडून गेलेला असून, स्तेय हा मनुष्य आणि राष्ट्रें यांचा स्वभावधर्म बनून गेला आहे. हा मानवी स्वभाव आमूलाग्र बदलून टाकून सत्य आणि अहिंसा यांच्या पायावर, कोणत्याहि प्रकारच्या सत्तेची किंवा शासनाची गरज नसलेलें, नवें जग आणि नवें युग निर्माण करण्यासाठीं गांधीवादाचा अवतार, गांधीजींचें सत्याग्रहाचें तत्त्वज्ञान आहे. त्या तत्त्वज्ञानाची प्रयोगभूमि होण्याचा बहुमान परतंत्र हिंदुस्थानाला लाभला, हा केवळ त्याचा भाग्ययोग होय. पण म्हणून कांहीं हिंदुस्थानाच्या दास्यमोचनासाठीं गांधीवादाचा अवतार आहे, किंबहुना गांधीवादानेंच हिंदुस्थान स्वतंत्र होईल, असें मानणें किंवा म्हणणें योग्य होणार नाहीं. जगांत सत्य आणि अहिंसा यांची स्थापना करण्याचें जें अत्यंत पवित्र कार्य आज गांधीवाद करीत आहे, त्या कार्याचा जो काय फायदा आपल्याला मिळेल त्याबद्दल हिंदुस्थानानें कृतज्ञ राहावें, पण त्याबरोबरच आपल्या दास्यमोचनाचा प्रश्न जरूर तर, कालाच्या अनुकूलतेप्रमाणें, स्वतंत्र रीतीनें सोडवावा, हीच भूमिका खुद्द, गांधीजींच्याहि दृष्टीनें, न्याय्य आणि व्यवहार्य ठरेल.

किंबहुना, हिंदुस्थानाच्या राजकीय स्वातंत्र्याचा प्रश्न

सत्य–अहिंसेच्या मार्गानेंच सुटावा असें जरी महात्माजींना मनःपूर्वक वाटत असलें, तरी खुद्द कांग्रेसमधील आपल्या सहकाऱ्यांनाहि ते या बाबतींत मत आणि कृति यांचें स्वातंत्र्य जें सतत देत आले आहेत, त्याचें मर्म झालें तरी हेंच होय. इतकेंच नव्हे, तर ऑगस्ट उठावणीशीं आपला आणि कांग्रेस-चाहि कांहींसुद्धां संबंध नाहीं असें वारंवार त्यांनीं जाहीर केलेलें असतांहि, चिमूर–आष्टीच्या, बिहारच्या किंवा आतां खुद्द आझाद हिंद फौजेंतल्याहि फांशीची शिक्षा झालेल्या उत्पातकांना सोडविण्यासाठीं जे त्यांचे भगीरथ प्रयत्न सारखे चालू आहेत, तेहि त्यांच्या या सहिष्णु, समावेशक धोरणाचेच निदर्शक म्हणतां येतील. अर्थात् गांधीजींना ऑगस्टवाद काय किंवा सुभाषवाद काय हे तत्त्वतः जरी मान्य नसले, तरी या दोन्ही वादांना व्यवहारतः त्यांना विरोध करण्याचें कारण नाहीं. म्हणूनच, गेल्या तीन महिन्यांत कांग्रेस आणि तिच्या लगामीं असलेला देशांतील बहुजनसमाज हीं सुभाषवादाचा अंगीकार झपाट्यानें करीत आहेत, हें उघड उघड दिसत असतांहि त्यानीं त्यासंबंधीं भ्रूभंगानेंहि नाराजी व्यक्त केलेली दिसत नाहीं. परमोच्च तत्त्वज्ञान आणि मानवी व्यवहार यांत जेवढा विरोध असतो, तेवढाच गांधीवाद आणि सुभाषवाद यांतहि. गांधीवाद हा सनातन, तर सुभाषवाद हा तात्कालिक आहे. गांधीवाद हा जगासाठीं, अखिल मानवजातीसाठीं आहे; तर

सुभाषवाद हा परतंत्र हिंदुस्थानासाठीं, दलित हिंदी जनतेसाठीं आहे. तेव्हां, ऑगस्टवाद आणि सुभाषवाद या दोहोंच्याहिसंबंधीं महात्माजींनीं, मान्यता नाहीं पण विरोधहि नाहीं, अशा प्रकारचें तटस्थ, मौनी धोरण स्वीकारावें, हें किती स्वाभाविक आहे ?

२० नोव्हेंबर १९४५

## ३

सुभाषवादासंबंधीं महात्माजींनीं धारण केलेल्या मुग्धतेचा प्रश्न जरी घटकाभर सोडून दिला, तरी कांग्रेसचें धोरण सुभाषवादासंबंधीं काय राहील किंवा कांग्रेसच्या धोरणावर त्याची अपरिहार्य प्रतिक्रिया काय होईल, हा प्रश्न शिल्लक उरतोच. सुभाषवादासंबंधीं आज जी उत्साहाची उधाण भरती सर्वत्र आलेली दिसते, तिला प्रत्यक्ष राजकारणाच्या दृष्टीनें फारशी किंमत देतां येणार नाहीं. कारण, एक तर, सुभाषबाबूंचें साहसी वीरचरित आणि आझाद हिंद फौजेवर चालू असलेला खटला यासंबंधींच्या कौतुकाच्या आणि सहानुभूतीच्या संमिश्र भावनांतून ही भरती उचंबळलेली आहे; व दुसरें असें कीं, आझाद हिंद सेनेच्या धर्तीवर अलाहाबादपासून तों नागपूरपर्यंत ज्या स्वयंसैनिकांच्या फौजा उभारण्याची धांदल सध्या सुरू आहे, त्यांच्या शिक्षणक्रमांत

सूतकताईपासून तों निशाणबाजीपर्यंत साऱ्या प्रकारांची गल्लत झालेली आहे हें लक्षांत घेतलें असतां, सुभाषवादाचें मर्म त्याची नक्कल वठवावयाला पुढें सरसावलेल्या या उतावळ्या अनुकारकांना उमजलेलें नाहीं, असें म्हणणें भाग आहे. किंबहुना, 'दिल्ली चलो' हा आझाद हिंद फौजेचा रणघोष पं. नेहरू यांच्यासारख्या अव्वल दर्जाच्या कांग्रेस पुढाऱ्यानें कायदेमंडळांच्या निवडणुकी लढविण्यासाठीं उचलावा, यांत सुभाषवादाच्या गौरवापेक्षां त्याची विटंबनाच खरोखरी जास्त नाहीं काय ? सुभाषवादाला जी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय अशी दुहेरी भूमिका आहे, तिचें मर्म ध्यानांत घेऊन जोंपर्यंत पं. नेहरूंसारखे कांग्रेसचे अग्रगण्य नेते आपलें धोरण स्पष्ट करीत नाहींत, तोंपर्यंत हा उत्साह आणि हें अनुकरण निरर्थकच म्हटलें पाहिजे.

पण, ब्रिटिश सरकारच्या घोषणांकडे ज्यांचे डोळे अजूनहि आशेनें लागलेले आहेत, ते कांग्रेसश्रेष्ठी जरी सुभाषवादासंबंधींची आपली भूमिका विशद करण्याचें आज टाळीत असले, तरी देशांतील बहुजनसमाजावर मात्र त्या वादाची प्रतिक्रिया झाल्याशिवाय राहणार नाहीं. कांग्रेस आणि तिच्या भजनीं असलेला बहुजनसमाज यांना गांधीजी गेलीं दोन तपें अहिंसेचे पाठ अव्याहत देत आले आहेत, ही गोष्ट खरी; परंतु, खुद्द कांग्रेसच्या नेत्यांमध्येंहि अहिंसा तत्त्वतः मान्य

नसलेले सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना अबुल कलम आझाद आणि पं. जवाहरलाल नेहरू यांच्यासारखे धुरंधर पुढारी असून, त्यांच्या विरोधामुळेंच खरोखरी सत्य–अहिंसेच्या सांच्यांत ( Truthful and non–violent means ) कांग्रेसचें क्रीड बसविण्याचा महात्माजींचा प्रयत्न यशस्वी होऊं शकला नाहीं. किंबहुना, आझाद आणि नेहरू हे दोघेहि,आपापल्या विशिष्ट प्रवृत्तिनुसार, सशस्त्र क्रांतीचे पुरस्कर्ते असूनहि, केवळ तशा प्रकारची उठावणी सद्य:स्थितींत अशक्य वाटत असल्यामुळेंच, ते अहिंसेला चिकटून बसलेले आहेत. इस्लाम हा अहिंसेचा भोक्ता नाहीं, हें ऐतिहासिक सत्य आहे; व समाजवादांत वर्गविद्रोह हा क्रमप्राप्त म्हणून गृहीत धरलेला असल्यामुळें त्यालाहि अहिंसा अभिमत नाहीं. तेव्हां, मौ. आझाद काय किंवा पं. नेहरू काय या दोघांनींहि गांधी-जींच्या अहिंसेविषयींच्या आग्रहाला केवळ धोरण म्हणूनच मान तुकवावी, यांत काय नवल ? १९०६–७ सालीं सशस्त्र क्रांतीचा प्रचार जेव्हां परांजपे–सावरकरांनीं महाराष्ट्रांत प्रथम सुरू केला, तेव्हां तरुणांच्या एका खाजगी सभेंत त्या प्रचारा-विषयीं बोलतांना टिळकांनीं असें मार्मिक उत्तर दिलें होतें कीं, “सशस्त्र बंड यशस्वी होण्याची थोडी जरी शक्यता मला तुम्ही दाखवून दिलीत, तर मीं बंडाचें निशाण त्या क्षणींच उभारीन !” मौ. आझाद आणि पं. नेहरू यांची

वृत्ति सशस्त्र क्रांतीच्या बाबतींत टिळकांच्या या वृत्तिहून निराळी नाहीं.

पण, धोरण म्हणून कां होईना, अहिंसेची जी ही मर्यादा १९४२ च्या ऑगस्टपर्यंत कांग्रेसनें निष्ठेनें पाळली, त्या मर्यादेची पद्धतशीर पायमल्ली ऑगस्टच्या आठ तारखेला अचानक सुरू झालेल्या उत्पाती उठावणींत कँाग्रेसमधील श्री. जयप्रकाश नारायण, श्री. अच्युत पटवर्धन, सौ. अरुणा असफअल्ली यांच्यासारख्या समाजवादी प्रवृत्तीच्या तरुण धुरंधर नेत्यांनीं ईर्ष्येनें केली; व त्यांच्या त्या उद्दाम ईर्ष्येनें उद्दीपित झालेल्या पीडित बहुजनसमाजानेंहि ऑगस्ट आंदोलनांत भाग घेतांना अहिंसेचा सारा विधिनिषेध सपशेल धाब्यावर बसवला. "ऑगस्टमधील दंगलींशीं माझा आणि कांग्रेसचा काडीचाहि संबंध नाहीं," असें जें महात्माजी नजरकैदेंतून सुटल्यापासून गेलीं दोन वर्षें आग्रहानें पण उद्वेगानें सारखे सांगत आले आहेत, तें कांहीं निष्कारण नव्हे. ऑगस्ट आंदोलनाचा अभिमंत्र त्यानीं किंवा कांग्रेसनेंहि दिला नव्हता, ही गोष्ट खरी. पण, त्याबरोबरच हेंहि तितकेंच खरें कीं, कांग्रेसमधील तरुण क्रांतिवादी धुरीणांनीं त्या उठावणीचें शिंग फुंकलें आणि कांग्रेसच्या लगामीं असलेला बहुजनसमाज, त्या रणशिंगाची काळजाला भेदणारी हांक कानांवर पडतांच, रामसेनेंतील वानरांप्रमाणें हातीं सांपडलें तें हत्यार घेऊन त्या उठावणींत सामील झाला.

गांधीजींना मान्य असो वा नसो, ऑगस्ट उठावणी ही आतां ऐतिहासिक घटना होऊन बसली आहे; व इतिहासाच्या विकासक्रमानुसार त्या घटनेचें जें काय फलित असेल, तें त्यांना स्वतःलाहि टाळणें अशक्य होईल. १९२२ च्या फेब्रुवारींत बारडोलीच्या सत्याग्रहाचा संगीन बार फुसका ठरावयाला कारण झालेला तो अवसानघातकी चौरीचुरा हिंदुस्थानाच्या इतिहासांत आतां पुन्हा कधीं डोकें वर काढण्याचा संभव नाहीं. किंबहुना, १९१९ सालांतील रौलॅट सत्याग्रहापासून आपण बुद्धिपुरस्सर चेतविलेला लोकक्षोभ आणि काँग्रेसमधील समाजवादी कार्यकर्त्यांची क्रांतिगर्भ विचारसरणी यांच्या समवायानें ऑगस्ट उठावणी घडून आली, याची पुरेपूर जाणीव असल्यामुळेंच बहुधा महात्माजींनीं अलीकडे मौन धारण केलेलें दिसतें.

सुभाषवाद ही ऑगस्ट उठावणीच्या पलीकडली उडी, ऑगस्टवादाच्या पुढली पायरी आहे. काँग्रेसमध्यें क्रांतिवादी पक्षाचा उदय झाल्यापासून गेलीं पंधरा वर्षें श्री. सुभाषचंद्र बोस, पं. जवाहरलाल नेहरू, श्री. जयप्रकाश नारायण, श्री. अच्युत पटवर्धन प्रभृति त्या पक्षाचे नेते गांधीवादाच्या चाकोरींतून काँग्रेसचें पाऊल बाहेर पडावें आणि आंतरराष्ट्रीय राजकारणांत क्रांतीचे जे मार्ग अभिमत झालेले आहेत, त्या मार्गांचा अवलंब काँग्रेसनें करावा, म्हणून सतत प्रयत्न करीत होते. त्या प्रयत्नांचा परिपाक, काँग्रेसमधील क्रांतिवादी पक्षाच्या त्या

कर्तृत्वाचा परिस्फोट म्हणजेच ऑगस्ट उठावणी होय; व दक्षिण महाराष्ट्रांत आज गाजत असलेलें ' पत्रीसरकार ' ही त्या उठावणीची परिसीमा म्हणतां येईल. त्यापलीकडे जाण्याचें सामर्थ्य ऑगस्टवादांत नाहीं. या सत्याची जाणीव तीव्रतेनें झाल्यामुळेंच ऑगस्टवादाच्या विफलतेनें कुंठित झालेल्या हिंदी जनतेला सुभाषवादाचा हिंदी राजकारणाच्या क्षितिजा-वर एकाएकीं झालेला उदय हा इतका स्वागतार्ह, इतका स्फूर्तिदायक वाटला! ऑगस्टवाद म्हणजे महायुद्धाची अनुकूल संधि दृष्टीस पडतांच बहुजनसमाजाच्या क्रांतिसंमुख युयुत्सु स्वातंत्र्याकांक्षेनें गांधीवादाच्या चाकोरींतून बाहेर पडून ब्रिटिश साम्राज्यशाहीशीं झुंज देण्यासाठीं केलेली धडपड होय. ती धडपड अशास्त्रीय आणि अनैतृक होती. उलट सुभाषवाद हा आंतरराष्ट्रीय यशस्वी क्रांतिमार्गांच्या दीर्घ चिंतनांतून आविर्भूत झालेला असून, त्याचें तत्त्वज्ञान आणि कार्यक्रम हीं दोन्ही शास्त्रशुद्ध आणि इतिहाससिद्ध आहेत. तेव्हां, आगस्टवादाच्या अपेशानें खचलेल्या बहुजन-समाजाला सुभाषवादाचें अपेशहि नव्या स्फूर्तीचें चैतन्य देणारें, नव्या मार्गाचें दर्शन घडविणारें वाटावें, यांत काय आश्चर्य?

२१ नोव्हेंबर १९४५

# ४

सुभाषवादासंबंधीं कांग्रेसचें धोरण काय राहील, या प्रश्ना-इतकाच, कम्युनिस्ट पक्षाचें धोरण काय राहील, हा प्रश्नहि महत्त्वाचा आहे. कारण, कांग्रेसच्या कक्षेबाहेर बहुजनसमाजाचा कैपक्ष घेऊन त्याच्या कल्याणासाठीं झगडणारा जर कोणता एक झुंजार पक्ष आज देशांत असेल, तर तो कम्युनिस्टांचाच होय; व त्यामुळें कॉंग्रेसनें जरी त्या पक्षावर अलीकडे बहिष्कार पुकारला असला, तरी देशांतील पीडित श्रमजीवी वर्गांत त्याचें वजन झपाट्यानें वाढत आहे, हें नाकारण्यांत अर्थ नाहीं. किंबहुना, १९०५ सालीं बनारसच्या अधिवेशनांत कै. ना. गोखले यांनीं उद्‌घोषिलेल्या वसाहतीच्या स्वराज्याच्या ध्येयाचा त्याग करून १९२७ सालच्या मद्रासच्या अधिवेशनांत संपूर्ण स्वातंत्र्याचें ध्येय स्वीकारावयाला आणि त्याबरोबरच देशांतील सर्व सत्ता–साधनसंपदेवर अंतिम स्वामित्व श्रमजीवी वर्गांचेंच राहील, अशी निस्संदिग्ध घोषणा करावयाला जर कांग्रेसला कोणी भाग पाडलें असेल, तर तें

तरुण साम्यवादी नेत्यांनींच होय. वसाहतीच्या स्वराज्यावरून कांग्रेस श्रमजीविकांच्या लोकराज्यावर आली, ती खरोखरी साम्यवादाच्या प्रभावानें; व कम्युनिस्ट पक्षावर आज कोणी कांहीहि आक्षेप घेतले, तरी ब्रिटिश सार्वभौम सत्तेचें उच्चाटन या देशांतून झाल्यावर येथें समाजसत्ताक लोकराज्य स्थापन होणार, हें निश्चित. कम्युनिस्टांची प्रारंभापासूनची भूमिका, देशांतील सर्व श्रमजीवी वर्गांचें लढाऊ संघटन करून आमूलाग्र क्रांति घडवून आणावयाची आणि वर्गविहीन लोकराज्य स्थापन करावयाचें, ही आहे. त्या भूमिकेचा अंगीकार कांग्रेसनें बव्हंशीं केलेला असून, कांग्रेसमधील क्रांतिवादी पक्ष जर शेवटल्या लढ्यांत प्रभावी आणि यशस्वी ठरले, तर हिंदुस्थानांत लोकराज्याची प्रतिष्ठापना होईल, यांत शंका नाहीं.

कम्युनिस्ट पक्षाचें अंतिम ध्येय, त्याची बहुजनसमाजाविषयींची कळकळ, त्यानें आजवर केलेला स्वार्थत्याग आणि त्याच्या क्रांतिकारक तत्त्वज्ञानाची कांग्रेसवर झालेली इष्ट प्रतिक्रिया ही सर्व वादातीत असतां, आज जो त्या पक्षावर कांग्रेसचा इतका रोष झालेला दृष्टीस पडतो, तो काय म्हणून? या रोषाचें मुख्य कारण असें कीं, हिंदी कम्युनिस्ट पक्ष हा स्वयंभू आणि स्वतंत्र पक्ष नसून रशिया आणि ब्रिटन या दोन्ही देशांतील मध्यवर्ती कम्युनिस्ट पक्षाच्या हुकमतीनुसार

तो हिंदी राष्ट्रीय चळवळीविषयींचें आपलें धोरण ठरवीत असतो. गेलें महायुद्ध आणि ऑगस्ट उठावणी या दोहोंच्या बाबतींत हिंदी कम्युनिस्टांचें जें विसंगत आणि लोकविरोधी वर्तन झालें. त्यामुळें त्या पक्षाची ही परप्रत्ययनेयता चव्हाट्यावर आली; व रशियासारख्या परकीय राष्ट्राच्या तंत्रानें चालणाऱ्या या पक्षाचें तत्त्वज्ञान कितीहि सोज्ज्वळ असलें, तरी असला हा परधार्जिणा पक्ष हिंदी राजकारणांत आणीबाणीच्या प्रसंगीं बेदिली आणि बेबनाव उत्पन्न करील, असा समज पैदा झाला. वस्तुतः ऑगस्ट उठावणीच्या बाबतींत गांधीजी आणि हिंदी कम्युनिस्ट यांची भूमिका व्यवहारतः तरी भिन्न नाहीं. ऑगस्ट उठावणीशीं कांग्रेसचा कांहींहि संबंध नाहीं असें कंठरवानें पुनःपुन्हा पुकारणारे गांधीजी आणि ऑगस्ट उठावणीपासून उघड उघड निषेधबुद्धीनें अलिप्त राहणारे राजाजी हे जर विश्वासघातकी न ठरतां काँग्रेसमध्यें उजळ माथ्यानें राहूं शकतात, तर कम्युनिस्टांवर ऑगस्ट उठावणीला विरोध केल्याबद्दल इतकी आग कां पाखडण्यांत यावी? तथापि, हिंदी कम्युनिस्ट पक्षाच्या गळ्यांत रशियाचें दावें घातलेलें असल्यामुळें, तो पक्ष हिंदी राजकारणांत बखेडा उत्पन्न करील, अशी जी भीति हिंदी राष्ट्रीय पुढाऱ्यांना वाटते, ती भीति चीनमध्यें आज चालू असलेली यादवी किंवा इराणमध्यें नुकत्याच पडलेल्या अंतर्गत कलहाच्या ठिणग्या पाहतां निराधार किंवा चुकीची आहे, असें म्हणण्याचें धाडस कोण करील?

किंबहुना, कांग्रेसचें राजकारण जर भविष्यकाळीं सुभाषवादावर जाणार असेल, तर कम्युनिस्ट पक्षाच्या भावी धोरणाचा प्रश्न आत्यंतिक महत्त्वाचा होऊन बसतो. पुढील महायुद्ध हें एका बाजूला इंग्लंड, अमेरिका आणि त्यांच्या साम्राज्यशाही गटांतील राष्ट्रें व दुसऱ्या बाजूला रशिया आणि त्याच्या समाजवादी गटांतील राष्ट्रें यांच्यांत होणार, हें भाकित वर्तवायला आतां कांहीं ज्योतिष्याची गरज नाहीं. युरोप आणि आशिया या दोन्ही खंडांत बड्या तिघांचे जे खटके पावलोपावलीं सारखे उडत आहेत व त्यांच्या विरोधी हितसंबंधांची जी कटकट महायुद्ध संपण्याचा रंग दिसूं लागल्या दिवसापासून सारखी चालू आहे, ती लक्षांत घेतां तिसऱ्या आगामी विश्वयुद्धाचें भीषण दृश्य डोळ्यांपुढें स्पष्ट उभें राहत नाहीं काय? आणि, हें युद्ध ज्या वेळीं सुरू होईल, त्या वेळीं हिंदी कम्युनिस्ट पक्षाचें धोरण काय राहील? इंग्लंडनें रशियाविरुद्ध युद्ध पुकारतांक्षणींच हिंदी कम्युनिस्ट पक्ष हा बेकायदा ठरवून जमिनींत गाडला जाईल; व या गाडलेल्या स्थितींतच फ्रान्समधील माकींप्रमाणें किंवा युगोस्लाव्हियांतील भूमिगतांप्रमाणें, तो ब्रिटिश साम्राज्यशाहीचीं पाळेंमुळें खणण्यासाठीं उत्पातांची पराकाष्ठा करील. कल्पना करा कीं, या आगामी महायुद्धांत जर कांग्रेसनें इंग्लंडचा पाठपुरावा करण्याचें ठरविलें, तर चीनमध्यें आज ज्या प्रकारची यादवी चंग-कै-शेकचें राष्ट्रीय सरकार आणि मॅओचें कम्युनिस्ट सरकार

यांच्यांत सुरू आहे, तशा प्रकारची यादवी हिंदुस्थानांत सुरू होईल कीं नाहीं? किंवा, कल्पना करा कीं, कॉंग्रेसनें सुभाषवादाचा अंगीकार करून तिसरें महायुद्ध सुरू होतांच खुद्द हिंदुस्थानांतच जर आझाद प्रतिसरकार स्थापन केलें, तर त्या सरकारला हिंदी कम्युनिस्ट पक्ष पाठिंबा देईल कीं त्याचे पाय तोडील? कम्युनिस्टांना जी क्रांति हवी असणार, ती रशियानुकूल हवी असणार; उलट सुभाषवादी कॉंग्रेस जी क्रांति घडवून आणण्यासाठीं उठावणी करील, ती सर्वथैव राष्ट्रीय दृष्टीनें. अशा स्थितींत सुभाषवादी कॉंग्रेस आणि हिंदी कम्युनिस्ट पक्ष यांचे संबंध परस्परांना पूरक राहतील कीं विरोधी राहतील?

सुभाषवादासंबंधीं हिंदी कम्युनिस्ट पक्षाचे जे ग्रह आज आहेत, तेच जर पुढेंहि कायम राहणार असतील, तर राष्ट्रवादी आणि कम्युनिस्ट यांच्यांतील यादवी अपरिहार्य आहे, असेंच खरोखरी म्हटलें पाहिजे. श्री. सुभाष बोस यांचें आझाद हिंद सरकार आणि आझाद हिंद फौज यांच्यावर कम्युनिस्टांचा मुख्य आक्षेप हा आहे कीं, "आझाद हिंद फौजेच्या मागें जपानी सामुराईची तलवार खडी होती. आझाद हिंद फौजेचें साहस जर यशस्वी झालें असतें, तर ती तलवार आपल्या लोकांच्या डोक्यांवर लटकत राहिली असती. ब्रिटिशांविषयींच्या द्वेषानें अंध होऊन असल्या प्रतिगामी

कल्पनांना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष पाठिंबा द्यावयाला आपण प्रवृत्त होतां कामा नये. या कल्पना म्हणजे हिंदी राष्ट्रीय चळवळीच्या लोकशाही परंपरेचा मूर्तिमंत प्रतिषेधच होय. " ( Behind the I. N. A. stood the sword of the Jap Samurai; that sword would have been hanging over the heads of our people if the I.N.A. venture had succeeded. Our hatred of the British should not lead us to giving direct and indirect support to such reactionary ideas which are a repudiation of the democratic past of the Indian national movement ) आझाद हिंद फौजेविषयीं हे जे उद्गार ता. २८ आक्टोबर १९४५ च्या 'लोकयुद्धा'च्या अंकांत् हिंदी कम्युनिस्ट पक्षाचे नेते श्री. पूर्णचंद्र जोशी यांनीं काढले आहेत, त्याबद्दल त्यांच्यावर रागावण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण खुद्द पं. जवाहरलाल नेहरू यांनीं तरी १९४२ ची ऑगस्ट उठावणी सुरू होण्यापूर्वी श्री. सुभाष बोस यांच्याविषयीं काय उद्गार काढले होते? जपानच्या सहाय्यानें हिंदुस्थानाला स्वतंत्र करण्याच्या सुभाषबाबूंच्या प्रयत्नांचा धिक्कार करतांना पंडितजींनीं असें स्पष्ट म्हटलें होतें कीं, "श्री. बोस यांची संगत आम्ही पुष्कळ वर्षांपूर्वी सोडून दिली आहे. आज तर आम्ही परस्परांपासून फारच दूर गेलों

आहोंत. त्यांनीं स्वीकारलेला मार्ग निखालस चुकीचा आहे. त्या मार्गाचा स्वीकार करणें तर मला अशक्य आहेच; पण तो मार्ग जर अंमलांत आला, तर त्याला विरोध करणें मला प्राप्त आहे. कारण जें कोणतें सैन्य बाहेरून चाल करून येईल, तें जपानच्या हुकमतीखालील कळसूत्री सैन्यच खरोखरी असणार हें उघड आहे. " ( We parted company with Bose many years ago. We have drifted further apart and today we are very apart. It is not good enough for me not to realise that the way he has chosen is utterly wrong–a way which I not only cannot accept, but must oppose if it takes shape. Because any force that may come from outside, it realy comes as a dummy force under Japanese control. ) पण तीन वर्षांपूर्वींचा हा जुना दाखला तरी कशाला हवा ? गेल्या जूनमध्यें सिमला परिषदे-पूर्वीं बंधमुक्त झाल्यावर, "सुभाषबाबू जर आपली आझाद फौज घेऊन हिंदुस्थानावर चालून आले, तर मला त्यांच्याशीं मुकाबला करावा लागेल," अशी घोषणा पंडितजींनीं केलेली नव्हती काय ? अशा स्थितींत आझाद हिंद फौजेला जपानची हस्तक ठरवून हेटाळल्याबद्दल एकट्या बिचाऱ्या कम्युनिस्टांवर काय म्हणून रागवावें ?

पण, कम्युनिस्टांवर रागवावयाचें तें एवढ्याचसाठीं कीं, श्री. सुभाष बोस यांचें आझाद हिंद सरकार आणि आझाद हिंद सैन्य हीं दोन्ही जपानच्या हुकमतीखालचीं कळसूत्री बाहुलीं नव्हतीं हें निर्विवाद सिद्ध करणारा पुरावा सारखा पुढें येत असतांनासुद्धां, पं. नेहरू यांच्याप्रमाणें त्यांच्याविषयींचे आपले चुकीचे पूर्वग्रह सोडून देण्याचा प्रांजळपणा दाखवावयाला कम्युनिस्ट तयार नाहींत. ता. २१ आक्टोबर १९४३ रोजीं आझाद हिंद सरकार स्थापन केल्यावर सुभाष-बाबूंनीं त्या सरकारचे नेताजी आणि सेनानी या नात्यानीं जरी लगेच इंग्लंड आणि अमेरिका यांच्याविरुद्ध युद्ध पुकारलें, तरी रशियाविरुद्ध मात्र शेवटपर्यंत केव्हांच युद्धघोषणा केली नाहीं, या घटनेचा अर्थ काय होतो ? श्री. रासबिहारी बोस यांच्याकडे जोंपर्यंत आझाद हिंद फौजेचें नेतृत्व होतें, तोंपर्यंत जपानचें वर्चस्व, अप्रत्यक्ष रीत्या कां होईना, त्या फौजेवर होतें, याबद्दल वाद नाहीं. पण, हिंदी स्वातंत्र्यसंघ आणि आझाद हिंद फौज यांचें जें नेतृत्व रासबिहारींकडून निघून सुभाषबाबूंकडे आलें, तें जपानचें नियंत्रण मानण्या-संबंधींच्या मुद्द्यावर मतभेद होऊनच नव्हे काय ? किंबहुना, ता. १५ ऑगस्ट १९४५ रोजीं जपानच्या शरणागतींत सामील होण्याचें नाकारून या तात्कालिक अपेशानें खचून न जातां आझादीचा लढा शेवटपर्यंत निकरानें चालविण्याचा जो आदेश सुभाषबाबूंनीं आझाद हिंद नभोवाणीवरून

आपल्या फौजेला दिला, तो काय ते जपानच्या मुठींतलें बाहुलें होतें म्हणून ? सारांश, श्री. सुभाष बोस यांनीं कांहीं काळ जर्मनी किंवा जपान यांचें सहाय्य राजकीय डावपेंचांच्या दृष्टीनें घेतलें म्हणून त्यांना फासिस्ट म्हणणें व त्यांच्या आझाद हिंद सरकारला प्रतिगामी ठरविणें, हा निव्वळ भाबडेपणा होय. तो भाबडेपणा इंग्लंड आणि रशिया यांच्यासारख्या स्वभावशत्रु राष्ट्रांच्या सहकार्याचा उदोउदो करून गेल्या साम्राज्यशाही युद्धाला लोकयुद्ध ठरविण्याचा अट्टाहास करणाऱ्या हिंदी कम्युनिस्टांनीं करावा, यापरता बुद्धिभ्रंश तो कोणता ?

२२ नोव्हेंबर १९४५

## ५

श्री. सुभाष बोस यांनीं हिंदी स्वातंत्र्याच्या लढ्यांत जपानसारख्या परकीय आणि त्याहि ब्रिटिश सरकारशीं रणांगणावर युद्ध करीत असलेल्या राष्ट्राची मदत घेतल्याबद्दल पं. जवाहरलाल नेहरू आणि हिंदी कम्युनिस्ट पक्ष यांनीं त्यांच्यावर जो आक्षेप घेतला आहे, त्यांतून दोन महत्त्वाचे प्रश्न उद्भवतात. ते प्रश्न असे कीं, एकादें परतंत्र राष्ट्र आपल्यावर सुल्तानी गाजविणाऱ्या साम्राज्यशाहीविरुद्ध ज्या वेळीं झुंज द्यावयाला उभें ठाकतें, त्या वेळीं त्यानें परकीय राष्ट्रांचें सहाय्य घ्यावें किंवा नाहीं? आणि जर घ्यावयाचेंच झालें, तर तें कोणत्या तत्त्वांवर, किती मर्यादेपर्यंत घ्यावें? त्यांपैकीं पहिल्या प्रश्नाचें उत्तर आजपर्यंत जगांत झालेल्या स्वातंत्र्ययुद्धांचा इतिहास तरी अस्तिपक्षींच देतो. इटालियन देशभक्त मॅझिनी, गॅरिबाल्डी आणि काव्हूर यांनीं ऑस्ट्रियन साम्राज्यशाहीविरुद्ध केलेल्या बंडाच्या उठावणींत इंग्लंड आणि फ्रान्स

यांची मदत घेतल्यामुळेंच तें बंड यशस्वी होऊन इटली दास्यमुक्त झाला; व आयर्लंडांतील सिनफेन पक्षाच्या उठावणींत डी व्हॅलेरा आणि ग्रिफिथ यांनीं जर्मनी आणि अमेरिका या दोन्हीहि राष्ट्रांचें सहाय्य प्रसंगानुसार घेऊन ब्रिटिश सरकारला जेरीस आणलें. पहिल्या महायुद्धांत पोलिश स्वातंत्र्यवीर पॅडरस्की यानेंहि रशिया आणि जर्मनी यांनीं गिळंकृत केलेल्या पोलंडला त्यांच्या पाशांतून सोडवून जें एकसंध पोलिश राष्ट्र निर्माण केलें, तेंहि इंग्लंड आणि अमेरिका यांच्या पाठबळाच्या जोरावरच. अर्थात्, स्वातंत्र्याच्या लढयांत जरूर तेव्हां परकीय राष्ट्रांचें साह्य घ्यावयाला हरकत नाहीं, असेंच अनुमान गेल्या दीडशें वर्षांतील स्वातंत्र्ययुद्धांच्या या उदाहरणांवरून निघत नाहीं काय ?

पण इतिहासांतल्या या जुन्या दाखल्यांची तरी काय गरज आहे ? नुकत्याच संपलेल्या महायुद्धांत मुसोलिनीनें धुळीला मिळविलेला हबसाण किंवा जपाननें छिन्नविच्छिन्न केलेला चीन यांनीं दोस्त राष्ट्रांच्या गोटांत सामील होऊन आपल्या राष्ट्रीय पुनरुत्थानाचा मार्ग सुकर करून घेतलाच कीं नाहीं ? आणि महायुद्ध सुरू होतांच जर्मनीच्या पहिल्याच मुसंडीला पोलंड, बल्जम, हॉलंड, फ्रान्स वगैरे जीं राष्ट्रें बळी पडलीं, त्यांनीं तरी आपलीं सरकारें इंग्लंडांत तात्पुरती हलवून नेऊन तेथूनच जर्मनीविरुद्ध गनिमी काव्याची उत्पाती उठावणी आपआपल्या

देशांत केली कीं नाहीं ? द गॉलपासून टिटोपर्यंत जे उत्पाती सेनानी गेल्या महायुद्धांत गाजले, त्यांनीं आपल्या मायदेशावर जर्मनीची झडप पडून तो परतंत्र होतांच, सुभाषबाबूंप्रमाणें इंग्लंड किंवा रशिया यांच्यासारख्या परकीय राष्ट्रांच्या आश्रयाला जाऊन त्यांच्या सहाय्यानेंच आपल्या मातृभूमीला मुक्त केलें नाहीं काय ? किंबहुना, लेनिन आणि स्टालिन हे जे हिंदी कम्युनिस्टांचे स्फूर्तिदाते परात्पर गुरु त्यांनीं तरी काय केलें ? इंग्लंड आणि फ्रान्स यांच्यासारख्या रशियाच्या वाईटावर असलेल्या परकीय प्रतिस्पर्धी राष्ट्रांच्या आसऱ्याला राहूनच त्यांनीं रशियांतील साम्यवादी क्रांतीची पूर्वतयारी केली नाहीं काय ? आणि जर्मनीच्या तडाक्यानें झारशाही खिळखिळी झालेली दिसतांच ती संधि साधूनच त्या शाहीचा निःपात केला नाहीं काय ? मॅझिनी, लेनिन, व्हॅलेरा आणि द गॉल यांनीं परदेशांत राहून केलेले क्रांतीचे हे उत्पाती प्रयत्न जर गौरवास्पद ठरतात, तर श्री. सुभाष बोस यांना जर्मनी किंवा जपान यांची मदत घेतल्याबद्दल पं. जवाहरलाल नेहरू किंवा हिंदी कम्युनिस्ट पक्ष यांनीं कां निंदावें ? युरोपांतील जर्मनविरोधी भूमिगत उत्पाती उठावणीची कंठ कोरडा पडेपर्यंत तारीफ करणारीं अँग्लोइंडियन वृत्तपत्रें ऑगस्ट उठावणीवर जशीं आग पाखडतात, त्याच मासल्याचें पं. नेहरू आणि हिंदी कम्युनिस्ट यांचें हें धोरण आहे, असें म्हटल्यास त्यांत चूक कोणती ?

अर्थात् स्वातंत्र्याच्या लढ्यांत परकीयांचे सहाय्य घेणें, हीं अगदी स्वाभाविक आणि अपरिहार्य गोष्ट आहे. कारण या लढ्याचें स्वरूप नेहमींच दुहेरी असतें. केवळ देशांतल्या देशांत उठावणी करून आपल्यावर सत्ता गाजवित असलेल्या बलाढ्य साम्राज्यशाहीला आपण उलथून पाडूं शकूं, अशी स्पृहा करणारा स्वातंत्र्यवादी हा खरोखरी शेख महम्मदच समजला पाहिजे. ती साम्राज्यशाही ज्या वेळीं संकटांत सांपडेल, त्या वेळीं त्या संकटाचा फायदा घेऊन तिच्यावर आंतून आणि बाहेरून आघात करून तिला जेरीस आणणें, हाच क्रांतीचा इतिहाससिद्ध मार्ग आहे. पहिल्या महायुद्धाच्या प्रारंभी स्वराज्याची चळवळ सुरू करतांना 'इंग्लंडवरील संकट हीच हिंदुस्थानाची संधि' (England's difficulty is India's opportunity) असें जें सूत्रवाक्य टिळकांनीं उच्चारलें होतें, त्याचें मर्म झालें तरी हेंच होय. ता. ९ जुलै १९४३ रोजीं सिंगापूर येथें केलेल्या भाषणांत श्री. सुभाष बोस यांनीं असें स्पष्ट सांगितलें होतें कीं, "हिंदुस्थानांत आपण जे काय प्रयत्न करूं, तेवढे प्रयत्न आपल्या मायदेशांतून ब्रिटि-शांची हकालपट्टी करावयाला पुरेसे होणार नाहींत, अशी माझी पक्की खात्री होऊन चुकली. हिंदुस्थान सोडून बाहेर जाण्यांत माझा उद्देश हा होता कीं, देशांतील चळवळीला बाहेरील चळवळीची जोड द्यावी. ही बाहेरची मदत घेतल्याशिवाय कोणालाहि हिंदुस्थान स्वतंत्र करणें

अशक्य आहे. सर्वसमर्थ ब्रिटिश सरकार जर युद्धसहाय्यासाठीं साऱ्या जगापुढें पदर पसरूं शकतें, किंबहुना गुलाम आणि कंगाल हिंदी लोकांपुढेंहि मदतीसाठीं हात पुढें करावयाला शरमत नाहीं, तर आपण अनिवार्यच झाल्यास बाहेरची मदत घेण्यांत कांहींच गौण किंवा गैर नाहीं. अक्षराष्ट्रांचें धोरण काय राहील, याचीहि आपल्याला पर्वा करण्याचें कारण नाहीं. हिंदुस्थानांतील आणि हिंदुस्थानाबाहेरील हिंदी लोक जर आपल्या कर्तव्याला जागले, तर ब्रिटिशांचें हिंदुस्थानांतून उच्चाटन करणें त्यांना शक्य आहे."

( I came to the conclusion that all the efforts that we could put forward inside India would not suffice to expel the British from our country. My object in leaving India was to supplement from outside the struggle going on at home. Without this supplementary help from outside it is impossible for anybody to liberate India. If the almighty British Government can go round the whole world with the begging bowl asking for help everywhere –even from the enslaved and impoverished people of India–there is nothing wrong in our taking help from outside, if we are forced to do so. It is not even necessary to bother about

the attitude of the Axis powers towards India. if Indian outside and inside Inda will only do thier duty, eir it is possible for the Indian people to throw the British out of India.)

श्री. बोस यांच्या या विचारसरणींत काय चूक आहे ? परतंत्र राष्ट्राचा स्वातंत्र्याचा लढा हा नेहमींच दुहेरी म्हणजे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय राहतो आणि राहिला पाहिजे, हें इतिहास-सिद्ध सत्य लक्षांत घेऊनच त्यांनीं स्वातंत्र्ययुद्धाचा व्यूह रचला नव्हता काय ?

अर्थात् जपान किंवा जर्मनी यांच्याशीं सहकार्य केल्या-बद्दल श्री. बोस यांना दोष देणें किंवा फासिस्ट म्हणून निंदणें अप्रयोजकपणाचें ठरेल. जपान आणि जर्मनी यांची मदत घेण्यांत सुभाषबाबूंपुढें कोणताहि तत्त्वाचा प्रश्न नव्हता; फक्त लष्करी डावपेंचांची दृष्टि होती. जपान किंवा जर्मनी यांच्याऐवजीं रशियाशीं जर त्या वेळीं इंग्लंडचें युद्ध सुरू असतें तर त्याचीहि मदत हिंदुस्थानाला दास्यमुक्त करण्यासाठीं त्यांनीं तितक्याच तत्परतेनें घेतली असती, यांत शंका नाहीं. रशियाऐवजीं जपानचें सहाय्य घेण्याचा प्रसंग त्यांच्यावर आला, हा केवळ युद्धजन्य योगायोग होय. त्या योगायोगांतून भलभलते अर्थ काढून त्यांना फासिस्ट ठरवणें अन्यायाचें नाहीं काय ? विशेषतः, अक्षराष्ट्रांची मदत घेतांना जी मर्यादा सुभाषबाबूंनीं

त्यांच्या सहकार्याला घातली होती, ती लक्षांत घेतल्यावर तर हा अन्याय मनाला तीव्रतेनें जाणवतो. १९४२ च्या मार्चमध्यें श्री. रासबिहारी बोस यांच्या अध्यक्षतेखालीं पूर्व आशियांतील हिंदी लोकांची परिषद् भरून हिंदी स्वातंत्र्यसंघाची ज्या वेळीं स्थापना करण्यांत आली, त्या वेळीं जपाननें देऊं केलेलें लष्करी साह्य स्वीकारतांना असें जाहीर करण्यांत आलें होतें कीं, "परकीयांचें अधिराज्य, हस्तक्षेप किंवा कोणत्याहि प्रकारचा तावा यांपासून मुक्त असें पूर्ण आणि अनिर्बंध स्वातंत्र्य मिळविणें हें या संघाचें उद्दिष्ट आहे." (Independence complete and free from foreign domination, interference and control of whatever nature shall be the object of the movement.) इतकेंच नव्हे, तर या परिषदेंत लष्करी चढाई आणि भावी राज्यघटना यांसंबंधीं जो ठराव झाला, त्यांत असें म्हटलेलें होतें कीं, "हिंदुस्थानावर जी लष्करी चढाई करावयाची, ती आझाद हिंद फौज हिंदी अधिकाऱ्यांच्या हुकमतीखालींच करील; व हिंदुस्थानाची भावी राज्यघटना तयार करण्याचें काम हिंदी लोकांच्या प्रतिनिधींवरच सोपविलें जाईल." (That military action against India will be taken only by the Indian National Army and under the command of Indians and that the framing of the future constitution of India will be left

entirely to the representatives of the people of India.) ता. २१ ऑक्टोबर १९४३ रोजीं आझाद हिंद सरकार स्थापन केल्यावर श्री. सुभाष बोस यांनीं जो जाहीरनामा त्याचे नेताजी आणि सेनानी या नात्यांनीं काढला, त्यांत तर, अक्षराष्ट्रांचा निर्देशहि न करतां, आझाद फौज स्वातंत्र्यसंग्राम करील, अशी घोषणा आझाद सरकारच्या नेतृत्वाखालीं केलेली होती. अशा स्थितींत सुभाषबाबूंना अक्षराष्ट्रांचे हस्तक किंवा फासिस्ट ठरवून त्यांनीं सर्वस्व पणाला लावून केलेल्या उज्ज्वल स्वातंत्र्य-संगराची जे हेटाळणी करतात, ते ध्येयवाद आणि मुत्सद्देगिरी या दोहोंच्याहि दृष्टीनें नादान ठरतात, असें म्हणावयाला काय हरकत आहे ?

२३ नोव्हेंबर १९४५

# ६

हिंदी राजकारणाच्या क्षितिजावर सुभाषवादाचा उदय इतक्या अकल्पित रीतीनें आणि अस्त इतक्या अल्पावधींत झाला कीं, ती लोकविलक्षण अद्भुत घटना पाहून श्री. बोस यांचे मित्र आणि शत्रु हे दोघेही दिङ्मूढ होऊन गेले; व तिच्या यथार्थ स्वरूपाचा बोध दोघांनाहि झाला नाहीं. किंबहुना, हिंदुस्थान सरकारनें जर आझाद हिंद फौजेच्या अधिकाऱ्यांवर बादशहां-विरुद्ध बंड केल्याच्या आरोपावरून खटले भरण्याचें ठरविलें नसतें, तर हिंदुस्थानाबाहेर स्वातंत्र्याचें निशाण उभारून ब्रिटिश साम्राज्यशाहीशीं सुभाषचंद्रांनीं जो हा एकाकी सामना केला, त्याचा अत्युज्ज्वल इतिहास जगापुढें कधींच येता ना आणि अँग्लोइंडियन वृत्तपत्रांच्या मतलबी प्रचारावर विसंबून नेहरूसारख्या उतावळ्या पुढाऱ्यांनीं हिंदुस्थानाच्या आधुनिक इतिहासांतील या अपूर्व स्वातंत्र्यसंग्रामाची जी अविचारी बदनामी केली, ती मात्र इतिहासांत नमूद होऊन जाती!

त्या दृष्टीनें आझाद सेनाधिकाऱ्यांची उघड चौकशी करण्याचें ठरवून सुभाषवादाला कायदेशीर रीत्या न्यायमंदिराच्या पवित्र प्रांगणांत पूर्णतेनें प्रकट होण्याची जी संधि हिंदुस्थान सरकारनें दिली, तिच्याबद्दल त्याला कोण धन्यवाद देणार नाहीं ? या खटल्यांत आतांपर्यंत पेश झालेल्या सरकारी पुराव्यावरून ही गोष्ट निर्विवाद सिद्ध झाली आहे कीं, राष्ट्रीयत्व, स्वातंत्र्य आणि लोकशाही यांच्या तत्त्वांना बाध आणणारें कृत्य घडणें तर राहोच, पण एक अवाक्षरहि सुभाषबाबूंच्या तोंडून निघालेलें नाहीं. किंबहुना, या पुराव्यांत दाखल करण्यांत आलेल्या त्यांच्या आज्ञा आणि प्रतिज्ञा, आदेश आणि उद्गार म्हणजे त्यांच्या स्वातंत्र्योत्सुक हृदयांत वेळोवेळीं जे विकार-विचार, ज्या आशाआकांक्षा, जे हर्ष-विषाद उचंबळून आले, त्यांचे प्रकाशकिरणांनीं घेतलेले जणुं आलेखच होत !

या आलेखांवरून जर पहिली गोष्ट कोणती लक्षांत येत असेल, तर ती ही कीं, गेलीं दोन तपें हिंदी राष्ट्रीय चळवळींतील निरनिराळ्या मोहिमांत प्रत्यक्ष काम केल्यावर, चळवळीचे हे सारे मार्ग स्वातंत्र्यप्राप्तीच्या दृष्टीनें थोड्या फार प्रमाणांत सारखेच विफल ठरतात, अशी अनुभवांतीं मनाची पूर्ण खात्री झाल्यामुळेंच, सुभाषबाबूंनीं आपला स्वतंत्र मार्ग काढला. ता. ९ जुलै १९४३ रोजीं सिंगापूर येथें केलेल्या

भाषणांत त्यांनीं असें स्पष्टच सांगितलें होतें कीं, "१९२१ सालीं विद्यापीठांतून बाहेर पडल्यापासून स्वातंत्र्याच्या आंदोलनांत मी सतत सक्रिय भाग घेत आलों आहे. गेल्या वीस वर्षांत झालेल्या कायदेभंगाच्या सर्व मोहिमांतून मी गेलेलों आहे. याशिवाय देशांत ज्या गुप्त क्रांतिकारक चळवळी झाल्या, मग त्या अत्याचारी असोत वा अनत्याचारी असोत, त्यांच्याशीं संबंध असल्याच्या संशयानें सरकारनें मला विनाचौकशी पुन: पुन्हा तुरुंगांत डांबलें आहे. यत्किंचितहि अतिशयोक्ति न करतां मी असें म्हणूं शकतों कीं, या बाबतींत मी जितका विविध अनुभव घेतलेला आहे, तितका अनुभव दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्रीय पुढाऱ्यानें घेतलेला नाहीं. या अनुभवामुळेंच माझी अशी खात्री होऊन चुकली कीं, देशांतल्या देशांत कितीहि प्रयत्न आपण केले, तरी ब्रिटिशांचें हिंदुस्थानांतून उच्चाटन करावयाला ते पुरेसे होणार नाहींत."

( I have been actively working in the Independence movement ever since I left the portals of the University in 1921. I have been through all the Civil Disobedience campaigns during the last two decades. In addition to this, I have been repeatedly put in prison without trial, on the suspicion of having been connected with secret revolutionary movement-

whether non-violent or violent—with which I have been familiar. I may also assert without the slightest exaggeration that there is no nationalist leader in India who can claim to possess the many-sided experience that I have been able to acquire. In the light of this experience I came to the conclusion that all the efforts that we could put forward inside India would not suffice to expel the British from our country.) राष्ट्रीय चळवळीच्या प्रचलित मार्गांच्या विफलतेच्या या जाणिवेबरोबरच आणखीहि एक जाणीव त्यांना झालेली होती. ती ही कीं, "हिंदुस्थान इतर सर्व दृष्टींनीं जरी स्वातंत्र्याला पात्र झालेलें असलें, तरी एका गोष्टीची मात्र त्याला उणीव आहे. ती म्हणजे स्वातंत्र्यसैन्य !" [Throughout my public career, I have always felt that though India is otherwise ripe for independence in every way, she has lacked one thing—namely, an army of liberation.] या बाबतींत त्यांच्या डोळ्यांपुढें आयर्लंडचा स्वातंत्र्यवीर डी व्हॅलेरा आणि पोलंडचा स्वातंत्र्यवीर पॅडरस्की यांचीं उदाहरणें होतीं. या दोघांनीं स्वदेशांत आणि स्वदेशाबाहेर स्वातंत्र्यसैन्यें उभारून युरोपांतील गेल्या महायुद्धाच्या क्रांतिकालांत जसें आपल्या मायदेशांना दास्यमुक्त केलें,

तसें हिंदुस्थानालाहि दास्यमुक्त करतां येईल, अशी त्यांची निष्ठा होऊन गेली होती. ब्रिटिश साम्राज्यशाहीशीं स्वदेशांत आणि स्वदेशाबाहेर अशा दोन्ही आघाड्यांवर झुंज देण्याचा जो हा स्वातंत्र्याचा नवा वीरधर्म त्यांनीं आदेशिला आणि आचरणांतहि आणला, तो वीरधर्म आजपर्यंत होऊन गेलेल्या सर्व हिंदी राजकीय चळवळींची विफलता आणि इतर परतंत्र राष्ट्रांतील क्रांतिवादाचें यश यांच्या जाणिवेंतून प्रादुर्भूत झालेला होता.

अर्थात् सुभाषवादाचें तत्त्वज्ञान आणि कार्यक्रम हीं दोन्ही या दुहेरी जाणिवेवर अधिष्ठित झालेलीं आहेत. आझाद हिंद फौजेवरील खटल्यांत आतांपर्यंत दाखल झालेले कागदपत्र, आझाद हिंद सरकारचा जाहीरनामा, सुभाषबाबूंचीं भाषणें आणि त्यांनीं अमलांत आणलेला कार्यक्रम यांवरून सुभाषवादाचे कांहीं सिद्धांत प्रतीत होतात. ते सिद्धांत असेः—[ १ ] ब्रिटिश साम्राज्यशाहीशीं प्रत्यक्ष सामना दिल्याशिवाय हिंदुस्थानाला पूर्ण स्वातंत्र्य प्राप्त होणार नाहीं; [ २ ] हा सामना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय अशा दोन्ही आघाड्यांवर घावा लागेल; [ ३ ] हा सामना देण्यासाठीं शक्य तर हिंदुस्थानांत नाहीं तर हिंदुस्थानाबाहेरं प्रतिसरकार (Parallel Government) स्थापन करावें लागेल; [ ४ ] या प्रतिसरकारला स्वतःचें स्वातं-

त्र्यसैन्य ( Army of liberation ) उभारावें लागेल; [ ५ ] विश्वयुद्धाच्या क्रांतिकालाची पर्वणी साधून हा सामना द्यावा लागेल; [ ६ ] या सामन्याची पूर्वतयारी देशांतील श्रमजीवि बहुजनसमाजाची लढाऊ संघटना आणि सैन्यदलें निर्माण करून करावी लागेल; [ ७ ] हा सामना देण्यासाठीं जरी कदाचित् परकीय राष्ट्रांची मदत घ्यावी लागली, तरी ती घेतांना या सामन्याचें नेतृत्व हिंदी धुरिणांच्याच हातीं राहील, हिंदी स्वातंत्र्यसेनेवर हिंदी अधिकाऱ्यांचीच हुकमत चालेल आणि परकीय सहाय्यकांना हिंदी भूमीवर परवानगीशिवाय पाऊल ठेवतां येणार नाहीं, या अटी घालाव्या लागतील; व [ ८ ] तात्पुरत्या प्रतिसरकारचा कार्यभाग संपल्यावर देशांतील सर्व धर्म, सर्व जाति आणि सर्व वर्ग यांच्या प्रतिनिधींकडून जी राज्यघटना लोकशाहीच्या मूलतत्त्वानुसार तयार करण्यांत येईल, ती अंमलांत आणून कायमचें लोकसत्ताक हिंदी राष्ट्रीय सरकार स्थापन करण्यांत येईल. सुभाषवादाचे हे सिद्धांत कोणाला मान्य होवोत वा न होवोत, व्यवहार्य वाटोत वा न वाटोत, त्यांत राष्ट्रीयत्वाच्या किंवा लोकशाहीच्या तत्त्वांना कमी-पणा आणणारें, सुभाषचंद्रांना नाझी किंवा फासिस्ट ठरविणारें कांहींहि नाहीं, हें मात्र निश्चित. किंबहुना, फ्रेंच राज्यक्रांति-पासून जगांत आजपर्यंत परतंत्र राष्ट्रांनीं जीं स्वातंत्र्ययुद्धें केलीं आणि दलित जनसमाजांनीं जीं वर्गयुद्धें केलीं, त्यांच्या

मुळाशीं असलेलीं स्फोटक क्रांतितत्त्वें आणि त्यांतील डावपेंच लक्षांत घेऊनच सुभाषचंद्रांनीं हे सिद्धांत बांधले आहेत, हें कोणालाहि मान्य करावें लागेल.

अर्थात् सुभाषवादाच्या रूपानें स्वातंत्र्यसिद्धीचा हा अगदीं अभिनव मार्ग आज हिंदी जनतेपुढें आला आहे. सावरकरांचा दहशतवाद, टिळकांचा बहिष्कारवाद, गांधीजींचा सत्याग्रह आणि काँग्रेसमधील तरुण समाजवादी पक्षाचा ऑगस्टवाद या आजपर्यंत हिंदी जनतेला माहित असलेल्या साऱ्या चळवळींच्या मार्गाहून हा मार्ग अगदीं भिन्न आहे, यांत शंका नाहीं. किंबहुना, त्या सर्व मार्गांहून स्वार्थत्याग, संघटना, साहस, शौर्य आणि शिस्त यांची जास्तींत जास्त अपेक्षा करणारा पण त्याबरोबरच यशाची मात्र हमी न देणारा असा हा अत्यंत खडतर मार्ग आहे. कारण या मार्गांत पूर्ण स्वातंत्र्याच्या प्राप्तीशिवाय आणि तें स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लोकराज्य स्थापन झाल्याशिवाय कोणत्याहि प्रकारच्या सामसंधीला, कोणत्याहि प्रकारच्या शस्त्रन्यासाला वाव नाहीं. म्हणून ता. ६ जुलै १९४३ रोजीं आझाद हिंद सैनिकांना या मार्गाचा आदेश देतानां श्री. सुभाष बोस यानीं असे उद्गार काढले होते कीं, "स्वातंत्र्यसैन्यांतील पहिला शिपाई होण्यासारखा गुलाम जनतेच्या आयुष्यांत दुसरा कांहीं गौरव नाहीं, दुसरें कांहीं

अभिमानास्पद नाहीं. पण या गौरवाबरोबरच जी जबाबदारी अंगावर पडते, तिची मला पूर्ण जाणीव आहे. म्हणून संकटाच्या आणि यशाच्या, दुःखाच्या आणि आनंदाच्या सर्व प्रसंगांत मी तुमच्याबरोबर राहीन, एवढीच एक ग्वाही मी तुम्हाला देतों. भूक, तहान, विपत्ति, चढाईचे आणि पिच्छेहाटीचे प्रसंग—आणि ? आणि मृत्यु !—यांच्याशिवाय दुसरें कांहींहि मी तुम्हाला देऊं शकत नाहीं. पण जीवनांत आणि मृत्यूंत जर तुम्ही माझ्या पाठीमागें याल,—आणि तुम्ही याल अशी माझी खात्री आहे !—तर मी विजय आणि स्वातंत्र्य यांच्याकडे तुम्हाला नेईन."

(For an enslaved people, there can be no greater pride, no higher honour, than to be the first soldier in the army of liberation. But this honour carries with it a corresponding responsibility and I am deeply conscious of it. I assure you that I shall be with you in darkness, and in sunshine, in sorrow and in joy, in suffering and in victory. For the present, I can offer you nothing except hunger thirst, privation, forced marches and death. But if you follow me in life and in death-as I am confident you will-I shall lead you to

victory and freedom.) सुभाषवादाच्या परिणामीं अमोघ, अत्यंत ओजस्वी पण तितक्याच भीषण स्वरूपाचें वर्णन करावयाला यापेक्षां अधिक समर्पक शब्द कोठून आणावेत ?

२४ नोव्हेंबर १९४५

# ७

आधुनिक क्रांतिमार्गांच्या चिंतनांतून उत्स्फूर्त झालेला सुभाषवाद आज जरी हिंदी जनतेला अत्यंत आकर्षक आणि स्फूर्तिदायक वाटत असला, तरी भावी हिंदी राजकारणांत त्याला कितपत वाव आहे ? या प्रश्नाचें उत्तर खरोखरी ब्रिटिश साम्राज्यशाहीच देऊं शकेल. कारण हिंदी स्वातंत्र्याचा प्रश्न हा सामोपचारानें सुटावयाचा कीं ब्रिटिश साम्राज्यशाहीशीं उघडउघड सामना देऊन हिंदुस्थानानें दास्यमुक्त व्हावयाचें, हें ब्रिटिश सरकारच्या धोरणावरच सर्वस्वी अवलंबून नाहीं काय ? आयर्लंड आणि इजिप्त यांच्या बाबतींत ज्या धोरणाचा अवलंब ब्रिटिश सरकारनें केला, त्या कालहरणाच्या आणि भेदनीतीच्या डावपेंचांचाच अवलंब जर तें हिंदुस्थानाच्याहि बाबतींत करणार असेल, तर हिंदी स्वातंत्र्याचा प्रश्न हा गुण्यागोविंदानें कसा सुटणार ? किंबहुना, आयर्लंडच्या बाबतींत जसा अल्स्टरमधील अँग्लो-

आयरिश अवलादीच्या कमअस्सल वसाहतीचा उपयोग करून त्याच्या स्वातंत्र्याच्या मागणीला ब्रिटनन पद्धतशीर विरोध केला व शेवटीं स्वातंत्र्य देणें जेव्हां अपरिहार्यच झालें तेव्हां चीरफाड करून तें अखेर दिलें, तोच कुटिल डाव, पाकिस्तानवादी मुस्लिम लीगचें प्यादें पुढें ढकलून, ब्रिटिश साम्राज्यशाही आज हिंदुस्थानांतहि खेळत असल्याचें प्रत्ययाला येत नाहीं काय ? अशा स्थितींत, शांततेच्या आणि सत्याग्रहाच्या मार्गानें आपल्या भवितव्याचा प्रश्न सुटणें अशक्य आहे, असें वाटून हिंदी जनतेनें जर उद्यां सुभाषवादाचा अंगीकार केला, तर त्यांत दोष कोणाचा ?

पण, आपल्या दुर्योधनी धोरणाचा हा परिणाम स्पष्ट दिसत असतांहि ब्रिटिश सरकार, धर्मराजाप्रमाणें पांच गांवांवर संतुष्ट व्हावयाला तयार असलेल्या महात्माजींसारख्या अहिंसावादी नेत्याचे समेटाचे सारे प्रयत्न लाथाडून, दलित बहुजन-समाजाला सुभाषवादाचा अंतिम मार्ग स्वीकारावयाला स्वतःच प्रवृत्त करीत आहे, याला काय करणार ? ता. १ आगस्ट १९४४ रोजीं रंगून येथें हिंदी स्वातंत्र्यसंघातर्फें साजऱ्या करण्यांत आलेल्या टिळकजयंतीच्या वेळीं बोलतांना श्री. सुभाष बोस यांनीं असे उद्गार काढले होते कीं "गांधीजींची योजना ही आपल्या योजनेहून सुकर आहे पण ती ब्रिटिशांनीं फेटाळून लावली. आतां गांधीजींची

योजना जरी सफल करावयाची झाली, तरी ती सफल करावयालाहि ब्रिटिशांना वठणीवर आणण्यासाठीं आपली लष्करी योजना यशस्वी होणें अवश्य आहे. ब्रिटिशांना आपला बेत जर हाणून पाडावयाचा असेल, तर एकच उपाय आहे. तो म्हणजे 'क्विट इंडिया' ठरावाच्या पायावर गांधीजी आणि काँग्रेस यांच्याशीं तह करणें ! जर ब्रिटिशांनीं खरोखरीच हिंदुस्थान सोडलें, तर आझाद हिंद फौज तावडतोब मोडून टाकण्याची विनंती मी तुम्हांला करीन." (Gandhiji's plan is a shorter cut than ours. But it is disapproved by the British. Now to fulfil even Gandhiji's plan, the success of our plan is absolutely essential to force the hands of the British. The only way the British can undo our plan fructifying is by making peace with Gandhiji and the Congress on the basis of the 'Quit India' Resolution. If the British quit India, I shall plead with you to disband the Fauj immediately.) पण, इंडोनेशिया-सारख्या परक्या डच साम्राज्यांतील छोट्या राष्ट्रानें लोकराज्य स्थापन करून आरंभिलेलें स्वातंत्र्ययुद्ध चिरडून, दडपून टाकण्यासाठीं जें ब्रिटिश सरकार हिंदी लष्कराची कुमक, हिंदी जनतेच्या निषेधाला न जुमानतां, आज डच साम्राज्य-

शाहीला पाठवीत आहे, त्याच्यापासून हिंदी स्वातंत्र्याचा प्रश्न गुण्यागोविंदानें सोडविला जाईल, अशी अपेक्षा करण्यांत काय अर्थ आहे ? ब्रिटिश साम्राज्यशाहीचें इंडोनेशियाच्या बाबतींतील धोरण हें हिंदी स्वातंत्र्याच्या चळवळीला पर्यायानें उत्तरच नाहीं काय ? नवल काय कीं, या उत्तराचें मर्म ओळखून पं. नेहरू यांच्यासारख्या गांधीजींच्या प्रभावळींतील चलचित्त पुढाऱ्यानेंहि, "हिंदुस्थानांतील ब्रिटिश राज्य दोन किंवा तीन वर्षांत संपुष्टांत येईल किंवा आणावें लागेल,' ( It was his view that the British Government would either come to an end in India in two or three years or would have to be ended during this period. ) असे क्रांतिसूचक उद्गार काढण्याची हिंमत करावी ?

कारण, सारें आशिया खंड किंवा जगांतील सारे दलित देश आणि समाज हे आज साम्राज्यशाही सत्तांच्या विरुद्ध, हातीं सांपडेल तें हत्यार घेऊन, प्राणपणाच्या ईर्ष्येनें झुंज द्यावयाला उभे ठाकले आहेत. भूमध्यसमुद्रापासून तों प्रशांत महासागरापर्यंत पूर्वेकडील जीं जीं राष्ट्रें आज अमेरिकन, ब्रिटिश, फ्रेंच किंवा डच साम्राज्यशाहीच्या पोलादी पाशांनीं जखडलीं गेलेलीं आहेत, त्या त्या सर्व राष्ट्रांतून क्रांतीची उठावणी झालेली असून, जेथें जेथें म्हणून पिळवणूक चालू

आहे, त्या त्या सर्व आघाड्यांवर खऱ्या लोकयुद्धाला सध्यां प्रारंभ झाला आहे. श्री. सुभाष बोस यांचें आझाद हिंद सरकार किंवा डॉ. सुकर्ण यांचें इंडोनेशियन रिपब्लिक हीं त्या लोकयुद्धाचीं केवळ प्रतीकें आहेत. तीं प्रतीकें जरी कदाचित् या साम्राज्यशाह्यांनीं एकवटून धुळीला मिळविलीं, तरी त्या प्रतीकांच्या मुळाशीं धगधगत असलेली दलित बहुजनसमाजाची स्वातंत्र्याकांक्षा कायमची विझवून गाडून टाकावयाला जगांतील कोणती शक्ति समर्थ आहे ? आशिया आणि आफ्रिका खंडांत, भूमध्यसमुद्रापासून तों प्रशांत महासागरापर्यंत साऱ्या पूर्वेभर जें हें लोकयुद्ध निरनिराळ्या आघाड्यांवर आज सुरू झालेलें आहे, त्याची प्रतिक्रिया हिंदुस्थानावर झाल्याशिवाय कशी राहील ? गांधीजींनीं १९२० सालापासून, निःशस्त्र प्रतिकाराची कां होईना, जी लढाऊ दीक्षा हिंदी जनतेला दिली, त्या दीक्षेचें, प्रसंग येतांच, सशस्त्र प्रतिकारांत कसें परिवर्तन होऊं शकतें, हें १९४२ च्या ऑगस्टमधील लढ्यानें सिद्ध केलेलें नाहीं काय ? ता. ८ ऑगस्ट १९४२ रोजीं ज्या क्षणीं ऑगस्टवादाच्या गुप्त उत्पाती आंदोलनाला सुरवात झाली, त्या क्षणींच गांधीयुग संपलें, गांधीवादाच्या उपयुक्ततेची घटका भरून गेली ! ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या कुटिल डावपेंचांमुळें जर लढ्याचा प्रसंग आतां पुन्हा आलाच, तर तो लढा

आशियांतील प्रक्षोभाच्या पार्श्वभूमीवर आगामी विश्वयुद्धाचा एक भाग म्हणून होईल, हें उघड दिसत नाहीं काय ?

आगामी भारतीय लढयाचें हें अनिवार्य भवितव्य लक्षांत घेऊनच श्री. सुभाषचंद्र बोस यांनीं आपलें आझाद हिंद सरकारचें स्वप्न मूर्तावस्थेला आणून दाखवलें. स्वतंत्र फौज आणि स्वतंत्र बँक असलेलें, जगांतील नऊ स्वतंत्र राष्ट्रांनीं मान्यता दिलेलें, स्वतंत्र भूमीवरलें पहिलें स्वतंत्र हिंदी सरकार !—त्याच्या संस्थापनेइतकें अधिक स्फूर्तिदायक काय असूं शकेल ? म्हणूनच सुभाषबाबूंचें अपेश हें आज ऑगस्टवादाच्या अपूर्ततेनें आणि विफलतेनें हताश झालेल्या हिंदी जनतेच्या हृदयांत नव्या वीरधर्माचा आवेश उत्पन्न करित असल्याचें प्रत्यहीं अनुभवाला येत आहे. मॅझिनी, लेनिन, पॅडरस्की, मुस्ताफा कमाल पाशा आणि डी व्हॅलेरा यांनीं ज्या क्रांतिमार्गाचा अवलंब करून आपले मायदेश दास्यमुक्त केले, त्या मार्गानें जाण्याचें अचाट साहस करणारा हा क्रांतदर्शी स्वातंत्र्यवीर या निःशस्त्र राष्ट्रांत निर्माण झाला, हें त्याचें केवढें भाग्य ! हिंदुस्थानाची स्वातंत्र्याकांक्षा आणि क्षात्रवृत्ति या दोन्ही अद्याप जिवंत आणि ज्वलंत आहेत, हें आझाद हिंद सरकारच्या स्थापनेनें सर्व जगाला कळून चुकलें; व जगांतल्या स्वतंत्र राष्ट्रांच्या प्रणालिकेंत या पददलित राष्ट्राची प्रतिष्ठा वाढली. त्या दृष्टीनें स्वतंत्र हिंदी

राष्ट्राचा द्रष्टा, सेनानी आणि निर्माता म्हणून श्री शिवाजी-महाराजांनंतर 'देशगौरवां'चाच गौरव हिंदुस्थानाच्या आधुनिक इतिहासांत केला जाईल, हें निर्विवाद होय. सुभाषचंद्र जिवंत असोत वा नसोत, त्यांनीं प्रत्यक्ष कृतींत आणून दाखविलेला त्यांचा केवळ आत्माच असा हा सुभाषवाद अमर आहे, मृत्युंजय आहे; व त्यांचें ऊर्जस्वल अपेश भावी पिढ्यांना स्वातंत्र्यसाधनेची कार्यस्फूर्ति सतत देत राहील, यांत शंका नाहीं.

२५ नोव्हेंबर १९४५

REFBK-0006688

# साने गुरुजी

## व्यक्ति आणि वाङ्मय

साने गुरुजींबद्दल आज पुष्कळ बोलबाला झाला असला तरी त्यांच्या वाङ्मयाचें संकलित दर्शन आणि त्यांच्या व्यक्तित्वाची पूर्ण ओळख घडविणारा ग्रंथ अजून मराठींत झालेला नाहीं. ही उणीव भरून काढण्यासाठीं आम्हीं मुद्दाम वरील पुस्तक प्रकाशित करीत आहों. पुस्तक २६ जानेवारी १९४६ रोजीं प्रसिद्ध होईल. पुस्तकाच्या रचनेच्या कामीं आठ दहा विद्वान साहित्यकांनीं मेहनत घेतलेली असल्यानें पुस्तकाची वेगळी शिफारस करण्याची गरज नाहीं.

**आचार्य भागवत** यांची विद्वत्पूर्ण प्रस्तावना--किं. रु. ५


प्रकाशक

**महाराष्ट्र ग्रंथ भांडार, मुंबई नं. ४**